# राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे
## जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, पुणे-४११००१

फोन नं.(०२०) २६०५०६४१ ई-मेल आयडी :- sceapune@gmail.com


जा.क्र.रासनिप्रा/निवडणुक/जि.स.नि.अ/बँक खाते/२०१५/475
दिनांक 17/०१ /२०१५

**वाचावे :**१. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम ७३ कब (१३)
२. महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणुक) नियम २०१४ मधील नियम ३ (६)
३.इकडील जा.क्र.रासनिप्रा /जिल्हा सनिअ आदेश /४६/सन २०१५ दि.२/१/२०१५
४. इकडील जा.क्र. रासनिप्रा/ निवडणूक प्रक्रीया घोषणा/४१०/सन २०१५ दि.१४/१/२०१५

**विषय : " राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य पुणे "** या नावाने राष्ट्रीयकृत बँकेत किंवा मागील वर्षी लेखापरीक्षणात 'अ' किंवा 'ब' वर्ग मिळालेल्या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत चालु खाते उघडणेबाबत...

ज्याअर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ कब चे तरतुदी अन्वये, सहकारी संस्थेच्या सर्व निवडणुका घेण्यासाठी व त्यासाठी मतदार याद्या तयार करण्यासाठी अधिक्षण, निर्देशन व नियंत्रण हे राज्य शासनाने गठीत केलेल्या " राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरणास " अधिकार प्राप्त आहेत. आणि,

ज्या अर्थी, राज्य शासनाने सहकारी संस्थांच्या निवडणुका घेण्यासाठी उक्त अधिनियमान्वये तयार केलेले व दि.२१/९/२०१४ रोजी अधिसुचीत केलेले महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणुक) नियम २०१४ हे अंमलात आले आहेत. आणि,

ज्या अर्थी, वाचावे क्र.३ नुसार महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणुक) नियम २०१४ चे नियम ४(I) मधील 'अ' वर्गातील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका व सर्व राज्यस्तरीय संघीय/ शिखर संस्था या प्रकारासाठी जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी घोषीत केलेले आहे. आणि,

ज्या अर्थी, उक्त नमुद निवडणुक नियमातील तरतुदीअन्वये सहकारी संस्थांच्या निवडणुका घेणेसाठी आवश्यक ते इतर सर्व आदेश/ परीपत्रके/ मार्गदर्शक सुचना राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरणाने निर्गमित केलेले आहेत. आणि,

ज्या अर्थी, वाचावे क्र.४ अन्वये दि.३१/१०/२०१४ अखेर समितीची मुदत संपलेल्या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका व सर्व राज्यस्तरीय संघीय/ शिखर संस्थांची निवडणुक प्रक्रीया सुरु करणेचे आदेश पारीत केलेले आहे. आणि,

ज्याअर्थी, निवडणुक प्रक्रीयेकरीता राज्य सहकार निवडणुक प्राधिकरणाच्या स्तरावर निवडणुक निधी ठेवण्याची तरतुद महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०, चे कलम ७३ कब (१३) मध्ये करण्यात आलेली असुन या निधीमध्ये प्राधिकरणाव्दारे विहित करण्यात येईल किंवा आवश्यक करण्यात येईल त्याप्रमाणे, प्रत्येक संस्थेने त्यांचे निवडणुकीवरील अंदाजित खर्चाची रक्कम म्हणुन आगाऊ स्वरुपात जमा करण्याची तरतुद आहे जेणेकरुन निवडणुकीवर होणारा खर्च या निधीतुन भागविला जाऊ शकतो त्यामुळे निवडणुक निधीची रक्कम जमा करावयाच्या रकमेकरीता बँकेत चालु खाते उघडणे आवश्यक आहे. आणि,

त्या अर्थी, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका व सर्व राज्यस्तरीय संघीय/ शिखर संस्थांकडुन निवडणुकीकरीता होणाऱ्या अंदाजित खर्चाची रक्कम म्हणुन आगाऊ स्वरुपात निवडणुक निधीमध्ये रकमा जमा करणेसाठी जिल्ह्यातील

राष्ट्रीयकृत बँकेत किंवा मागील वर्षी लेखापरीक्षणात 'अ' किंवा 'ब' वर्ग मिळालेल्या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत चालु खाते उघडणेबाबत प्राधिकरण खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहेत :

**-: आदेश :-**

राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरणास महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ कब (१३), व महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणुक) नियम २०१४ चे नियम ३ (v) व (vi) अन्वये प्राप्त अधिकारानुसार जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका व सर्व राज्यस्तरीय संघीय/ शिखर संस्था यांची निवडणुक प्रक्रीया सुरळीत पार पाडण्याच्या दृष्टीने जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी तथा विभागीय सहनिबंधक यांनी संबंधित जिल्ह्यातील राष्ट्रीयकृत बँकेत किंवा मागील वर्षी लेखापरीक्षणात 'अ' किंवा 'ब' वर्ग मिळालेल्या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत **" राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य पुणे "** या नावाने बँक चालु खाते उघडण्यात यावे. याबाबत खालीलप्रमाणे सुचना देणेत येत आहेत, त्याचे काटेकोरपणे अंमलबजावणी जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी यांनी करावी.

१. सदर बँक खात्यावर जमा होणाऱ्या निवडणुक निधीचा A/C Payee / रेखांकित धनादेश **" राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य पुणे "** या नावाने संबंधीत संस्थेकडुन घेण्यात यावा.
२. नवीन उघडलेल्या बँक खात्यातील जमा होणाऱ्या रकमा व त्यामधुन खर्च होणाऱ्या रकमांचा स्वतंत्र सविस्तर हिशेब राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य पुणे यांना निवडणुक निकालाच्या दिनांकापासुन ३० दिवसांचे आत सादर करावा.
३. सदर बँक खाते चालविण्याचा अधिकार जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी यांना त्यांचे सहीने राहील.
४. संस्थांच्या निवडणुका पार पाडल्यानंतर जमा निवडणुक निधी मधुन खर्च वजा जाता उर्वरीत शिल्लक रक्कम RTGS/ NEFT / रेखांकीत A/C Payee चेकने संबंधीत संस्थेस निवडणुक निकालाचे दिनांकापासुन २ महिन्यांचे आत पाठवावी.
५. ह्या संदर्भातील सर्व लेखे राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य पुणे यांचे तपासणीचे अधिन राहतील व ती वर्षातुन १ वेळ करणेत येईल. त्यासाठी प्राधिकरणाने विहीत केलेल्या नोंदवहीतच जमा खर्चाच्या नोंदी कराव्यात.
६. निवडणुकीसाठी नियुक्त व्यक्तींचे परिश्रमिकाव्यतिरीक्त इतर निवडणुकीवर होणाऱ्या खर्चाची देयके शक्यतो चेकने द्यावी.
७. या खात्यावर निवडणुक निधी जमा खर्चाचे व्यतीरिक्त इतर कोणतेही व्यवहार करु नयेत.
८. जमा खर्च ताळमेळ पत्रक दरमहा जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी यांनी अद्यावत ठेवावे.

**मा.आयुक्त, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य पुणे यांचे आदेशानुसार.**

14/1/15

**(डॉ. आनंद जोगदंड)**
सचिव
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे सत्यमेव जयते

**प्रति,**
जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी
तथा विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (सर्व)

**प्रत माहितीस्तव :-** १.जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी (सर्व)
२. तालुका सहकारी निवडणूक अधिकारी (सर्व)

**प्रत सस्नेह रवाना :-** १.मा.सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे
२.मा. साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे
३.मा. संचालक, हातमाग,यंत्रमाग व वस्त्रोद्योग, महाराष्ट्र राज्य, नागपुर
४.मा. आयुक्त (दुग्ध विकास), महाराष्ट्र राज्य, अब्दुल गफार खान मार्ग, वरळी सी फेस, मुंबई
५.मा. पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे